IMPACT FACTOR
5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN
2455-4375

# कोरोनाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम

**डॉ. वैजयंती पेशवे**
असोसिएट प्रोफेसर,
कमला नेहरू महाविद्यालय,
नागपूर.
Email- vaijayantipeshwe@gmail.com

---

**गोषवारा** :

एक लहानसा विषाणू संपूर्ण जगात हाहा:कार माजवू शकतो याचा प्रत्यय आपण सगळेच होत आहोत. कोरोनाने सर्वच क्षेत्रात दूरगामी परिणाम केले आहेत. उद्योग, व्यापार, शेती, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती, शिक्षण, ही सगळीच क्षेत्रे याने प्रभावित झाली आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात घट झाली. माणसे माणसापासून दुरावली, अर्थव्यवस्थेने निचांक गाठला, बेकारी वाढली. गृहकलह, घटस्फोट, घटस्फोट, एकाकीपणा, व्यक्तिवाद, स्वार्थीपणा, आत्माकेंद्रीवृत्ती, वाढीला लागली. दुसऱ्या बाजूने अनेक चांगल्या गोष्टीही माणसाने स्वीकारल्या, उदा: स्वच्छता व आरोग्याबाबत जागरुकता. हा अनुभव गाठीशी घेऊन येणाऱ्या काळात अशी आपली आली तर माणसाने त्यापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी कायम स्वरूपी बदल स्वीकारणे गरजेचे आहे.

**प्रमुख शब्द** :

कोरोनोत्तर कालखंड , लॉकडाऊन , विरोधाभासी, विस्फोट, व्यक्तिवाद, आत्मकेंद्रितपणा, मुखाच्छादन , ताळेबंदी, विलगीकरण, भौतिक दूरता, वेबिनार, वर्क फ्रॉम होम, वंदेभारत.

**"मती गेली, गती गेली, वित्त गेले**
**इतके अरिष्ट एका विषाणूने आले "**

या विषाणूने जगभर भीती, अस्थिरता, चिंता, असुरक्षितता व मृत्यूचे थैमान घातले.या मृत्यूच्या छायेखाली १८० देश होरपळून निघाले. संपूर्ण जगात पसरलेली करोनाची दशहत अजून संपली नाही. तिसऱ्या लाटेकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. करोनारूपी राक्षसाने समाजाची घडी विस्कटून टाकली आहे. करोना विषाणूने आक्रमण केले नाही असे एकही क्षेत्र उरले नाही. याचा सगळ्यात मोठा परिणाम झाला तो मनुष्याच्या आरोग्यावर ! जगात एक कोटी पेक्षा जास्त लोकांचा करोनामुळे मृत्यू झाला. असंख्य बालके अनाथ झाली. अनेक पालकांना आपल्या मुलांना गमवावे लागले. अनेकांचे व्यवसाय बुडाले. अनेकांचे रोजगार गेले. आपल्याला लागलीच लक्षात येणार नाही इतके सखोल आणि सुक्षमपरिणाम मानवी जगण्यावर झाले आहेत. एक लहानसा विषाणू संपूर्ण जगाचे चित्र पालटवू शकतो असे कोणी भविष्य सांगितले असते तर आपला विश्वास बसला नसता.

जग जवळ आले याचा माणसाला मोठा अभिमान वाटत होता. विज्ञानाने आपण मृत्यूवर मात करू असा अहंकार मानवाच्या मनात निर्माण झाला होता. पण या करोनाने सम्पूर्ण जगाला वेठीस धरले. अमेरिकेसारखा महासत्ता ठरलेला देश देखील हादरून गेला. संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था ढासळली आहे. 'धरले तर चावते आणि सोडले तर पळते' अशी याविषाणूची स्थिती आहे. टाळेबंदी केली तर साथ आटोक्यात आल्यासारखी वाटते, पण त्याचा परिणाम म्हणून समाज आणि राष्ट्राला आर्थिक रुग्णता येते. या विषाणूचा सार्वजनिक आयुष्याच्या सर्वच क्षेत्रावर दूरगामी परिणाम झालेला आहे. उद्योग, व्यापार, शेती ही क्षेत्रे संकटात सापडली आहेत. कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती, शिक्षण ही क्षेत्रे देखील प्रभावित झाली आहेत. पुढे कदाचित इतिहासात कालगणना करतांना या कालखंडाचा उल्लेख ''कारोनोत्तर कालखंड'' असा केला जाण्याची शक्यता आहे. या कालखंडात नोंद घेण्यासारख्या महत्वाच्या एका गोष्टीचा मानवाला प्रत्यय आला की करोना व्हायरस कुठलाही भेदभाव करीत नाही. संस्कृती, धर्म, व्यवसाय, आर्थिक स्थिती आणि प्रसिद्धी यात माणसामाणसात प्रचंड तफावत असली तरी आपण एकाच पातळीवर आहोत याची जाणीव करोना ने करून दिली. माणसा चे स्वास्थ्य किती महत्वाचे आहे आणि आपण त्याची किती हेळसांड करतो याची जाणीव तीव्रतेने झाली.

नवी पिढी पहिल्यांदा या महामारीला सामोरी गेली. स्वच्छंद आयुष्यावर बंधने आली. या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेचे फार मोठे नुकसान झाले. राष्ट्रीय उत्पन्न २३.९ टक्क्यांनी घटले. टाळेबंदीमुळे विमान वाहतूक, पर्यटन, रेस्टॉरंट, हॉटेल यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले, अर्थव्यवस्था वाढीचा वेग मंदावला, बेरोजगारीचे प्रमाण वाढले, सेंटर ऑफ मॉनिटरिंग इकॉनॉमिच्या आकडेवारी नुसार एप्रिल ते ऑगस्ट २०२० याकाळात २१ दशलक्ष कर्मचाऱ्यांनी नोकऱ्या गमावल्या. कामगारांना पायी आपल्या गावी परतावे लागले. अर्थव्यवस्था वाढीच्या वेगाने ४१ वर्षातील निचांक गाठला. आय.एम.एफ. च्या म्हणण्यानुसार गेल्या शंभर वर्षातील ही आर्थिक क्षेत्रातील सगळ्यात मोठी मंदी आहे. बेकारीचे प्रमाण २४ टक्के असून अर्धबेकारीचे प्रमाण तर विचारायलाच नको.

लॉकडॉऊन मध्ये खूप विरोधाभासी चित्र दिसलं, एकीकडे सेलिब्रिटीज पदार्थांच्या वेगवेगळ्या रेसिपी करताना दिसतात, तर दुसरीकडे लाखो लोक भुकेने उपाशी पोटी शेकडोमैल पायी चालत आपलं गावगाठतांना दिसतात. कुठे घरातले सगळे एकत्र बसून अंताक्षरी खेळतात, तर काही लोकशून्यात हरवलेले दिसतात. कुठे एकेका खोलीत एकटे एकटे लोक आयसोलेट झाले तर दुसरी कडे एका खोलीत आठ आठ–दहा दहा लोक दाटीवाटीने राहताना दिसतात. लॉकडॉऊन मध्ये घरात असलेल्या जेष्टांच्या आयुष्यातील पोकळी वाढलेली दिसते. लहानमुलांचे मोकळेपणाने मैदानावर खेळणे संपले. या काळात अनेक डॉक्टरांवर हल्ले झाले. हा त्यांच्या वरचा राग नसून मनात दबलेल्या अनेक गोष्टींचा विस्फोट होता. तसेच याकाळात गृहकलह, घटस्फोट, एकाकीपणा, चिंता, भीती आणि नैराश्य यासगळ्यांचे प्रमाण खूप वाढले. समाजातील अस्थिरता, विषमता, व्यक्तिवाद, स्वार्थीपणा, आत्मकेंद्रितपणा या वृत्तीही वाढल्या.

नाण्याच्या नेहमी दोन बाजू असतात. करोनाच्या बाबतीतही तसेच म्हणता येईल. करोनाने प्रचंड नुकसान केले पण या काळात आपल्याला खूप गोष्टी शिकवल्या. आपलं आयुष्य अनेक अर्थानी बदललं. करोनाच्या काळात रेस्टारेंट बंद झालीत. जंक अन्ना ऐवजी घरी सकस अन्न शिजू लागले. पुरुषांनाही घरकामात मदत

करण्याची सवय लागली. माणसांची किंमत कळली. घरातही आनंद साजरा करता येऊ शकतो, याची जाणीव झाली. सगळे जण आरोग्याबाबत सजग झालेत. रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी वेगवेगळ्या उपाय योजना करण्यात येऊ लागल्या. ताज्या भाज्या, फळे यांचा आहारात वापर वाढला. हळद, मध असणाऱ्या वनऔषधींचा वापर वाढला. निरोगी जीवनात व्यायामाचं महत्व पटलं. चंगळवादी मानसिकतेत बदल घडून आला. अन्नदान, वस्त्रदान करणारे अनेक दाते पुढे आलेत. कमी लोकांमध्ये कमी खर्चात लग्नाचा आनंद उपभोगता येऊ शकतो याचा लोकांना प्रत्यय आला. अन्नाची नासाडी कमी होऊ लागली. काळाने आपल्याला आयुष्याचे मोल पटवून दिले. अनेकांनी या काळात मिळालेल्या संधीच सोन केलं. अनेकांना रोजगार मिळाला. मुखच्छादनाचे उत्पादन वाढल्यामुळे अनेकांना रोजगार मिळाले. वारंवार हात धुण्याची, स्वच्छता पाळण्याची सवय लागली. टाळेबंदी, विलगीकरण, भौतिक दूरता या शब्दांशी आपला परिचय झाला.

या काळाने इंटरनेटचे महत्व पटवून दिले. शाळा, महाविद्यालये बंद झाल्यामुळे आभासी वर्ग सुरु झाले. सेमिनारच्या ऐवजी वेबिनार आले. कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची परवानगी दिल्याने "वर्क फ्रॉम होम" ही संकल्पना दृढ झाली. परदेशात अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यासाठी केंद्र सरकारने 'वंदेभारत' ही मोहीम सुरु केली. जगातल्या ९८ देशांमधून ४५.८२ लाख भारतीयांना परत आणण्यात आले. भारतात विविध लसीच्या मानवीचाचण्या पार पडल्या. भारतबायोटेकची कोवॅक्सीन ही लस उपलब्ध झाली. ऑक्सफोर्डच्या कोविशील्ड लसीची भारतात मोठ्य प्रमाणात निर्मिती झाली. भारताने अनेक देशांना औषध पुरवठा केला व आपल्यातील माणुसकीचे दर्शन घडविले. या व्हायरसने संपूर्ण जगाला नुकसान पोहचवले असेल तरी टाळेबंदीमुळे तब्बल ७० वर्षाने जगातील हवा शुद्ध झाली. जागतिक तापमानात घट झाली. प्रदूषण कमी झाले. नोकरीसाठी बाहेर गेलेली मुले लॉकडाऊनमुळे घरी परतली व आई वडिलांच्या सहवासाचा आनंद घेताना दिसली.

या काळात आलेल्या अनुभवावरून आपण सर्वांनी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की पुढील वर्षांमध्ये कोरोना व्हायरस सारख्या अनेक विषाणूशी मानवाला सामना करावा लागू शकतो. अश्या परिस्थितीत माणसाने आपली सामाजिक, आर्थिक वैयक्तिक, जीवन शैली अश्या प्रकारे बनवावी की त्याची कमीतकमी हानी होवून अशा परिस्थितीत तो सावरू शकला पाहिजे. जगाने, देशाने अशा विषाणूंचे आक्रमण रोखण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना कायम स्वरूपात राबवायला हवी. अशा विषाणूपासून जगाला वाचवणे ही प्रत्येक माणसाची जबाबदारी व कर्तव्य आहे याचे भान कर्तव्यदक्ष नागरिकांनी जपायला हवे.

संदर्भ :


- https//frainly.in>questions, "कोरोना संकटाचे मानवी जीवनावरील परिणाम"
- https//www.esakal.com "कोविड १९ मुळे काळ बदलले"
- https://www.who.int/emergencies/deases/mygovt.in/covid-19
- https://www.oecd.org/coronavirus/en/policy-responses